दैनिक www.esuryodaylive.com Email : suryodaykokan.123@gmail.com

महाराष्ट्र

# सूर्योदय

मुख्य संपादक : गंगाधर काळकुटे

अक्षय संभाजी कामठे (संपादक पुणे आवृत्ती)




पुणे || वर्ष २ रे || अंक २३५ || शनिवार १० ऑगस्ट २०२४ || RNI No.MAHMAR/2014/54581 || Postal Regd No.L/74/RNP/Beed/2019-21 || पाने ४ किंमत २ रुपये ||

## प्रवचनातून समाजाचे प्रबोधन घडते;सोमेश वैद्य यांच्याकडून महाप्रसाद वाटप

महेश पवार सोलापूर

जीवन कसे जगावे,कसे बोलावे,कसे वागावे यांची माहिती प्रवचनातङ्गनकळत दिली जाते.प्रवचनातून चांगले विचार व दृष्टांत ऐकायला मिळतात,प्रवचनातून ऐतिहासिक व धार्मिक माहिती मिळते.यामुळे आपण जीवन जगताना कुठे चुकतो यांचे आपल्याला जाणीव होते.त्यामुळे आपल्या चुका आपण दुरुस्त करू शकतो.प्रवचन ऐकल्याने ख-या अर्थाने आपल्या जीवनाला योग्य दिशा मिळते असे प्रतिपादन स्वयंम शिक्षा फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष सोमेश वैद्य यांनी केले.मंद्रूप येथील ग्रामदैवत श्री मळसिध्दप्पा मंदिरात आयोजित केलेल्या प्रवचनाला वैद्य यांनी उपस्थित राहून मळसिध्दप्पा मंदिरात आरती केली यावेळी त्यांच्याकडून भाविकांना



महाप्रसाद व महिला भाविकांना पर्सचे वाटप करण्यात आले यावेळी ते बोलत होते.यावेळी मंचावर युवा नेते हर्षवर्धन देशमुख,ङ्गसुरेश पाटील,बाळासाहेब देशमुख,तमण्णा पुजारी, सुरेश टेळे, मळसिध्द देशमुख, शिवानंद लोभे, सिध्दाराम काळे आदी उपस्थित होते.

यावेळी वैद्य म्हणाले

श्रावण हा पवित्र महिना म्हणून ओळखला जातो,या महिन्यात सर्व निसर्ग सृष्टी हिरवाईने नटलेली असते.प्रत्येक गावात आणि मंदिरात धार्मिक वातावरण असते.ठिकठिकाणी प्रवचनाचे आयोजन केले जाते.या प्रवचनामुळे समाजाचे प्रबोधन होते.

प्रत्येक व्यक्तींनी प्रवचनाचा लाभ घ्यावा असे आवाहन करून श्रावण महिन्यात माझ्याकडून दर सोमवारी व शनिवारी दक्षिण सोलापूर तालुक्यातील विविध मंदिरात अकरा हजार भाविकांना महाप्रसाद वाटप केले जाते.तसेच ५१ हजार बेसन लाडू, गरजूंना छत्री वाटप,गोर-गरीब मुलांना शैक्षणिक साहित्य वाटप, महिलांना पर्सचे वाटप करण्यात येत आहे.आगामी विधानसभेची निवडणूक आपण सोलापूर दक्षिण विधानसभा मतदारसंघातून लढणार असून जनतेनी आपल्याला साथ द्यावीत.आपण आमदार झाल्यावर मंद्रूप शहरासह संपूर्ण सोलापूर दक्षिण विधानसभा मतदारसंघाचा सर्वांगीण विकास करू अशी ग्वाही

त्यांनी शेवटी बोलताना सांगितले.

यावेळी त्यांनी मंद्रूप येथीलच श्री चौडेश्वरी देवीचे दर्शन घेऊन येथेही त्यांनी प्रवचन श्रवण केले.

## नुमवि शिशु शाळेत नागपंचमीचा सण मोठ्या उत्साहात साजरा

सोलापूर : (सैफन शेख) गुरुवार ०८ ऑगस्ट रोजी नुमवि शिशु शाळेत नागपंचमीचा सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून




मोठा गट रागेश्री च्या पालिका सुवर्णा मैंदर्गीकर यांना आमंत्रित करण्यात आले होते. या कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने करण्यात आली. मुख्याध्यापिका अर्चना कुलकर्णी व प्रमुख पाहुणे यांनी नागोबाचे व प्रतिकृती तयार केलेल्या वारुळाचे पूजन केले. मुख्याध्यापिका यांनी श्रावण महिन्यात येणाऱ्या सणांची मांदियाळी सांगितली. पंचमीच्या सणाचे महत्त्वही सांगितले. छोट्या मोठ्या गटातील विद्यार्थिनी मुख्याध्यापिका व प्रमुख पाहुणे मैंदर्गीकर सर्व शिक्षिका सेविका यांनी नागोबाची गाणी म्हणत फेर धरला. झिम्मा फुगड्या असे पारंपारिक खेळ खेळण्यात आले. ङ्गङ्गयावेळी मोठा गट रागेश्री तील विद्यार्थी युवराज रेड्डी याने गारुड्याची भूमिका छान पार पाडली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार अनिता जाधव यांनी केले.

## श्री ज्ञानेश्वर शिक्षण संस्थेत आत्मशोधाची वारी छायाचित्र प्रदर्शनी संपन्न

पुणे विशेष प्रतिनिधी

( आळंदी )

पेशाने सिव्हिल इंजिनियर असणारे, प्रायोगिक छायाचित्रकार, फिल्म मेकर, बाईकर, सोलो ट्रॅव्हलर, सामाजिक कार्यकर्ते, ज्यांची कलेवर नितांत श्रद्धा आहे असे झिवा स्टुडिओचे संस्थापक प्रज्ञेश मोळक यांच्या फोटोग्राफी कलेच्या माध्यमातून काढलेल्या आत्मशोधाची वारी या छायाचित्राचे प्रदर्शन श्री ज्ञानेश्वर शिक्षण संस्थेच्या कै. दत्तात्रय मारुती आढाव कलादालन (आर्ट गॅलरी) येथे संपन्न झाले. ङ्गप्रज्ञेश मोळक यांनी २०१९ ते २०२३ सलग पाच वर्षे आळंदी ते पंढरपूर आषाढी पायी वारी करून वारी कशी असावी या संकल्पनेतून वारीची महिमा आपल्या फोटोग्राफीच्या माध्यमातून वारीतील आनंद क्षणचित्रे टिपण्यात आली. ङ्गज्ञानेश्वर मोळक यांनी पुत्र प्रज्ञेश मोळक यांच्या वाढदिवसानिमित्त प्रज्ञेश मोळक यांनीच वारीतील टिपलेल्या छायाचित्राचे प्रदर्शन भरवून प्रज्ञेश मोळक यांना अनपेक्षित कार्यक्रम घेऊन आश्चर्याचा धक्का दिला. हे सर्व पाहून प्रज्ञेश मोळक यांच्या आनंदाला पारावार राहिला नाही. ङ्गया आत्मशोधाची वारी छायाचित्र प्रदर्शनीचे उद्घाटन संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष प्रवीणदादा गायकवाड यांच्या शुभहस्ते फित कापून संपन्न झाले. याप्रसंगी प्रज्ञेश मोळक, आळंदी नगरपालिकेचे मुख्याधिकारी कैलास केंद्रे, श्री ज्ञानेश्वर महाराजांचे वंशपरंपरागत चोपदार राजाभाऊ चोपदार, पुणे मनपाचे निवृत्त अतिरिक्त आयुक्त ज्ञानेश्वर मोळक, ज्यांनी भव्यदिव्य कार्यक्रमाचे आयोजन केले अशा शैलजाताई मोळक, पुणे शहरातील प्रसिद्ध बांधकाम व्यवसायिक व कलादालन निर्मितीला मदत करणारे रमेश आढाव, संस्थेचे सचिव अजित वडगावकर, खजिनदार डॉ. दीपक पाटील, विश्वस्त लक्ष्मण घुंडरे, प्रकाश काळे, हास्य रंगाचे संपादक



ज्ञा.ग. चौधरी, ज्ञानेश्वर शिक्षण संस्थेचे सदस्य अनिल वडगावकर, आळंदी विविध कार्यकारी सोसायटीचे संचालक जनार्दन घुंडरे, विद्यालयाचे प्राचार्य दीपक मुंगसे, प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक प्रदीप काळे, पर्यवेक्षक किसन राठोड, मोळक परिवारावर प्रेम करणारे त्यांचे नातेवाईक, मित्र शिक्षक, विद्यार्थी आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.ङ्गकार्यक्रमाच्या प्रास्ताविकामध्ये शैलजा मोळक यांनी श्री ज्ञानेश्वर शिक्षण संस्थेचा ऋणानुबंध व आळंदीशी जोडलेली नाळ याविषयीची प्रेमळ भावना व्यक्त केली. तसेच त्याच आळंदीत आणि त्याच श्री ज्ञानेश्वर शिक्षण संस्थेत आपल्या पुत्राच्या आत्मशोधाची वारी तील छायाचित्रांचे प्रर्दशनीचा आनंदाचा दिवस साजरा करण्याची संधी मिळाल्याबद्दलचा आनंद व्यक्त केला. मुलाने केलेल्या कार्याचा गौरव आनंद व्यक्त करत विद्यार्थ्यांनीही आपल्या जीवनातील कलागुणांना वाव देऊन मोठे व्हावे अशी इच्छा व्यक्त केली. तदनंतर अजित वडगावकर यांनी खऱ्या अर्थाने आज प्रज्ञेश मोळक यांच्या माध्यमातून माऊलींच्या वारीतील छायाचित्राचे प्रदर्शन भरवून कलादालन (आर्ट गॅलरी) निर्मितीचा हेतू साकार झाल्याचा आनंद व्यक्त केला. मोळक परिवाराचे सामाजिक, आध्यात्मिक इत्यादी क्षेत्रात असलेले निस्वार्थ योगदान / कार्य तसेच प्रज्ञेश यांची वारीतील छायाचित्र टिपण्यासाठीची होणारी धावपळ आधी गोष्टींना शब्दरूप दिले.ङ्गत्यानंतर प्रज्ञेश मोळक यांनी जिंदगी वसूल या भाषणाच्या विषयातून सर्वप्रथम श्री ज्ञानेश्वर शिक्षण संस्था व पदाधिकारी यांनी आत्मशोधाची वारी छायाचित्र प्रदर्शनासाठी संधी दिल्याबद्दल त्यांचे आभार व्यक्त केले. प्रथमेश मोळक यांनी आत्मशोधाची वारी तील आलेले अनुभव आणि इतर क्षेत्रात असलेले आपले योगदान, कार्य याविषयी सांगत असताना त्यांनी विद्यार्थ्यांना जीवनामध्ये मोठी स्वप्ने पहावीत, चलनाचा योग्य वापर करावा, कोणत्याही परिस्थितीमध्ये विचलित न होता लढत, हसत - खेळत जीवनात सतत प्रवाही राहावे, ध्येयापर्यंत जाण्यासाठी हव्यास असावा, कधीही हार मानू नये, सकारात्मक विचाराने बदल घडवून पुढे जावे, जीवनात सतत स्पर्धा असावी, स्वतःशी संवाद साधने असे अनेक मोलाचे संदेश दिले. तसेच या वारीमुळे स्वतःच्या आयुष्यात झालेले सकारात्मक परिवर्तन याविषयी विचार व्यक्त केले. जिंदगी वसूल ही आदर्श जीवनाकडे नेणारी थीम असल्याचे सांगत प्रत्येकाने जीवनातील अंतिम ध्येय एक चांगला व आदर्श माणूस घडण्यासाठी सतत प्रयत्न करत राहणे गरजेचे असल्याचे सांगितले. त्यानंतर प्रकाश काळे यांनी विद्यार्थ्यांना संस्कारक्षम बनविण्यासाठी शैक्षणिक ज्ञानाबरोबरच एक आदर्श जीवन जगण्यासाठी आवश्यक असलेल्या संतांच्या आचार व विचारांचा प्रचार व प्रसार करण्यासाठी सर्वांनी योगदान देण्याचे गरजेचे असल्याचे सांगितले. कैलास केंद्रे यांनी राज्यसेवा परीक्षेचे स्वरूप सांगत त्यासंबंधीची विद्यार्थ्यांना आवश्यक अशी माहिती दिली. प्रत्येक विद्यार्थ्यांनी आपल्या व्यक्तिमत्त्वाचा विकास करत आपले छंद जोपासून त्याला जीवनाचे व्यावसायिक स्वरूप द्यावे असे सांगितले तसेच प्रत्येकाने आपल्या जीवनातील प्रत्येक आठवणींना संग्रही करून सांभाळून ठेवण्यासाठी सांगितले. व कार्यक्रमाच्या शेवटी प्रवीण गायकवाड यांनी सर्वप्रथम आपल्या मनोगतातून संस्था व शाळेच्या वास्तू मध्ये प्रवेश करतात मन प्रसन्न झाल्याचा आनंद व्यक्त करत संस्था पदाधिकाऱ्यांचे कौतुक केले.

## कुटुंबात अनोखी आघाडी!, आई काँग्रेसच्या नेत्या, मुलीच्या खांद्यावर राष्ट्रवादीची धुरा

सांगली : राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या महाराष्ट्र प्रदेश महिला आघाडी उपाध्यक्षपदी सोनिया सत्यजित होळकर यांची बुधवारी निवड करण्यात आली. सोनिया होळकर या सांगलीचे दिवंगत काँग्रेस नेते मदन पाटील यांच्या कन्या आहेत.

आई जयश्रीताई पाटील यासुद्धा काँग्रेसच्या नेत्या आहेत. त्यामुळे त्यांच्या कुटुंबात अनोखी आघाडी नोंदली गेली आहे. सोनिया यांची निवड सांगलीच्या राजकीय पटावर सध्या चर्चेचा विषय बनली आहे.

नाशिक येथे झालेल्या कार्यक्रमात बुधवारी पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील व महिला आघाडीच्या प्रदेशाध्यक्षा रोहिणी खडसे यांच्याहस्ते होळकर यांना नियुक्तीपत्र देण्यात आले. यावेळी नाशिकचे निरीक्षक आमदार सुनील भुसारा, गोकुळ पिंगळे, दत्तात्रय पाटील उपस्थित होते. जयंत पाटील म्हणाले की, पक्ष बळकटीसाठी तसेच पक्ष मजबूत करण्यासाठी सोनिया होळकर चांगले कार्य करतील, असा विश्वास वाटतो.



सोनिया होळकर सध्या नाशिक येथे सासरी राहतात. कृषी उत्पन्न बाजार समिती लासलगावच्या संचालकपदी त्या कार्यरत आहेत. राष्ट्रवादीच्या नाशिक शहर युवती आघाडीचे नेतृत्व त्यांनी केले आहे. काँग्रेसचे दिवंगत नेते व माजी मंत्री मदन पाटील यांच्या त्या कन्या आहेत. सोनिया यांच्या आई जयश्रीताई पाटील सध्या जिल्हा बँकेच्या उपाध्यक्षा व काँग्रेसच्या नेत्या म्हणून सांगलीतील राजकीय क्षेत्रात कार्यरत आहेत.जयंत पाटील व मदन पाटील यांच्यात पूर्वी राजकीय संघर्ष होता. मात्र सांगली जिल्हा बँकेच्या एका निवडणुकीत हे दोन्ही नेते एकत्र आले होते. मदन पाटील यांनी राष्ट्रवादीत यावे म्हणून जयंत पाटील यांनी प्रयत्न केले होते. मात्र, त्यांना यश आले नाही. मदन पाटील यांच्या पश्चात जयश्रीताई पाटील यांनाही राष्ट्रवादीमध्ये घेण्यासाठी जयंत पाटील यांच्याकडून प्रयत्न झाले होते. मात्र, जयश्रीताई पाटील यांनी काँग्रेसमध्येच राहणे पसंत केले. जयंत पाटील यांच्या नेतृत्वात आता मदन पाटील यांच्या कन्येला महिला आघाडीच्या प्रदेश उपाध्यक्षपदाची जबाबदारी दिल्यानंतर या निवडीची चर्चा राजकीय पटावर रंगली आहे.



संपादकीय

## ‘आयआयटी’

आर्थिक उदारीकरणाचे वारे वाहू लागले नव्हते तोपर्यंत अभियांत्रिकीच्या तीन शाखांवर आपल्याकडे भर दिला जात असे. यांत्रिकी (मेकॅनिकल), विद्युत (इलेक्ट्रिकल) आणि स्थापत्य (सिव्हिल) अभियांत्रिकी या तीन शाखांची विभागणीही गुणानुक्रमे होत असे. यापेक्षाही गुणवान ‘आयआयटी’त जात. त्याही काळात याद्वारे होणारी अभियंत्यांची निर्मिती पुरेशी नव्हतीच आणि होते त्यातील गुणवान परदेशी जाण्यात धन्यता मानत. ही अभियंत्यांची संख्या वाढवावी या वरकरणी आणि दिखाऊ हेतूने आणि स्वपक्षीय राजकारण्यांस धननिर्मितीचे सहज सोपे साधन निर्माण व्हावे या अंतस्थ आणि खऱ्या हेतूने तेव्हा खासगी अभियांत्रिकीची दुकाने आपण मोठ्या प्रमाणावर उघडली. एखादी नवी योजना हाती घेण्याआधी तिच्या अंमलबजावणीचा साकल्याने विचार आणि तशी तयारी न करण्याचा आपला ऐतिहासिक परिपाठ याबाबतही दिसून आला. या नव्या खासगी अभियांत्रिकी महाविद्यालयांकडे ना आवश्यक साधनसामग्री होती ना प्रशिक्षित अध्यापक. त्यात या संस्थांचे चालक पडले राजकारणी. त्यामुळे कोणत्याही दर्जा निश्चितीखेरीज पिठाच्या चक्क्यांप्रमाणे ही अभियांत्रिकी महाविद्यालये सुरू केली गेली. स्वपक्षीय राजकारण्यांस सुखावण्यासाठी वा अन्यपक्षीय राजकारणी आपल्याकडे यावेत यासाठी या महाविद्यालयांचा खिरापतीप्रमाणे वापर झाला. ही महाविद्यालयांची संख्या इतकी वाढली की ती जिवंत ठेवण्यासाठी आवश्यक विद्यार्थीही आपणास मिळेनासे झाले. ही धोक्याची पहिली घंटा.

तीकडे दुर्लक्ष केल्याने परिस्थिती सुधारण्याऐवजी अधिकच बिघडत गेली. ती आणखी रसातळाला नेण्यात महत्त्वाचा वाटा उचलला नव्याने उदयास आलेल्या संगणकीय विद्याशाखेने. त्यातही बाजारपेठी आकर्षणास बळी पडून घरोघरी आपल्या लेक/लेकीस ‘‘तू हार्डवेअरपेक्षा ‘सॉफ्टवेअर’ला जा’’ असे सल्ले मुबलक पालक देत. त्यामुळे अमूर्त अशा या विद्याशाखेत भरती होणारे वाढत गेले. त्यातील बहुसंख्य हे ‘संगणकीय टंकलेखक’ या दर्जाचे होते हे नाकारणे अवघड. यांचीही संख्या अखेर इतकी वाढली की बरकत असूनही सॉफ्टवेअर उद्याोगावर त्यांना दरवाजाबाहेर बाकांवरच बसवण्याची वेळ आली. मागणीपेक्षा पुरवठा अधिक झाला– आणि तोही कमअस्सल दर्जाचा– की यापेक्षा आणखी काय होणार? संगणक अभियंते वाढले म्हणून भारतीयांनी काही संगणकीय उत्पादनांची निर्मिती केली म्हणावे तर त्याबाबतही बोंब. या क्षेत्रातील जे गुणवान होते त्यांनी अमेरिकेचा रस्ता धरला आणि गूगल, ॲपल, ॲमेझॉन, मायक्रोसॉफ्ट आदी क्रियाशीलांची सेवा करण्यात धन्यता मानली. हे कमी म्हणून की काय या काळात एका नव्याच क्षेत्राचा उदय झाला.

ते म्हणजे सेवा क्षेत्र. कुणीतरी घरे बांधायची आणि इतरांनी ती सांभाळायची, घरात काही हवे–नको ते पाहायचे आणि लागेल तेव्हा हरकामास दाराशी सेवेस सादर व्हायचे म्हणजे ‘सर्व्हिस इंडस्ट्री’. कितीही उदात्तीकरणाचा प्रयत्न केला तरी सेवा क्षेत्र म्हणजे अखेरीस यापेक्षा अधिक काही नाही. इंटरनेट महाजालाच्या प्रसार– प्रभावामुळे दूरदेशीच्या आस्थापनांचे पगार काढणे, कर्मचारी व्यवस्थापन, दूरध्वनीवरून माहिती देणे इत्यादी उद्याोग येथे बसून करण्याची सुविधा मोठ्या प्रमाणात वाढू लागल्याने आणि त्या प्रमाणात त्या क्षेत्रात रोजगारनिर्मितीही मोठ्या प्रमाणावर होऊ लागल्याने आपल्याकडे तरुणांच्या झुंडीच्या झुंडी त्या क्षेत्रात दाखल होऊ लागल्या. इतके दिवस अमेरिका, युरोप आदी विकसित देशांतील नोकरीच्या उच्चमध्यमवर्गीयांपुरत्याच उपलब्ध असलेल्या संधी या सेवा क्षेत्राच्या विस्ताराने बहुजन समाजातील तरुणांसही सहज मिळू लागल्या आणि पुणे, पार्ले, डोंबिवली आदी शहरांची मक्तेदारी पिंपरी–चिंचवड, परभणी आणि डिग्रस आदींनी मोडून काढली. यास जोड मिळाली ती वाढत्या वित्तीय (फायनान्स) आणि नंतर वित्त–तंत्र (फिनटेक) या क्षेत्रांची. कमी कष्टात अधिक पैसा कसा मिळवता येतो हे पहिल्याने दाखवून दिले आणि या दुसऱ्याने या वित्तक्षेत्रास सेवेची जोड दिली. अभियंते होऊन स्वत:स कष्टवण्यापेक्षा भांडवली बाजारात पैसे फिरवत अधिक नफा मिळवून देणाऱ्या गुंतवणूकदारांची संख्या या काळात अतोनात वाढली. परदेशी गुंतवणूकदारांस या काळात दोन पर्याय होते. चीन आणि भारत. यातील पहिला पर्याय निवडणाऱ्यांस चिनी राज्यकर्त्यांनी कारखानदारीत गुंतवणूक करणे भाग पाडले आणि दुसऱ्या पर्यायात भारतात फक्त पैसा आला. गुंतवणूक नाही. हा नवा

# रा. जि. प. सिद्धेश्वर शाळेचा १४९ वा वर्धापन दिन सोहळा उत्साहात संपन्न

रायगड जिल्हा

उत्तर प्रतिनिधी/मंगेश यादव

सिद्धेश्वर शाळेचा १४९ वा. वर्धापन दिनांक ६ ऑगस्ट रोजी साजरा करण्यात आला. यावेळी माजी विद्यार्थींनी सौ. लीलावती रघुनाथ सितापराव यांच्या अध्यक्षतेखाली साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात शाळेतील पहिली ते सातवी मध्ये वार्षिक परीक्षेत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा बक्षीस वितरण व सिद्धेश्वर गावातील चालू वर्षी दहावी ते बारावी ते पंधरावी परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या व विशेष प्राविण्य मिळवलेल्या माजी विद्यार्थ्यांचा गुण गौरव सोहळा बक्षीस देऊन साजरा करण्यात आला. ङ्ग यावेळी दरवर्षीप्रमाणे याही वर्षी प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांकांना बक्षीस वितरकांनी बक्षीस देऊन मान्यवरांच्या हस्ते गुणगौरव करण्यात आला. या कार्यक्रमासाठी शाळा व्यवस्थापक कमिटीने तसेच शाळेय शिक्षकांनी बरीचशी मेहनत घेतली. आजच्या या कार्यक्रमासाठी भोजनाची व्यवस्था गणेश सावंत व गणपत जाधव यांच्याकडून करण्यात आली होती. या









कार्यक्रमात कायम ठेव देणगीदारांचा सन्मान करण्यात आला. माजी विद्यार्थ्यांची भाषणे झाली. विद्यार्थी प्रतिनिधीचे मनोगत, मुख्याध्यापकांचे मनोगत त्यानंतर प्रमुख पाहुणे गटशिक्षणाधिकारी सुधागड साधूराम बांगारे यांनी आपलं मनोगत व्यक्त करताना विद्यार्थ्यांना सांगितले. ज्या शाळेत आपण घडलो त्या शाळेला आपण कधी विसरायचे नाही. तसेच आई–वडील यांना कधी विसरू नका. शाळा आहे दिशा देणारे यंत्र आहे. आपल्या शाळेसाठी शिक्षक कमी असताना शिक्षकाची व्यवस्था माझ्याकडून करण्यात आली. तसेच आपणास शाळेसाठी इतर सुविधा उपलब्ध करून देईल. आपली शाळा ही शिक्षणात पुढे आहे. तसेच निसर्गप्रेमी शिक्षक भिलारे गुरुजी आपल्या शाळेला लाभल्याने झाडेझुडपे, रोपे तयार करून शाळेभोवती लावल्याने शाळा सौंदर्यवान दिसू लागली आहे. यावेळी बोलताना त्यांनी विद्यार्थ्यांना आपली शाळा बक्षीस पात्र असल्याने मुख्यमंत्री माझी शाळा व सुंदर शाळा यासाठी तीन लाख रुपये बक्षीस जाहीर केले आहे. ते बक्षीस जिंकण्यासाठी आपल्याला संधी आहे ते आपल्या शाळेला मिळू शकते. यासाठी शिक्षक आपले योगदान आपल्यासाठी देतायेत त्याचा फायदा घ्यायचा आहे. तसेच शाळेय व्यवस्थापक कमिटी आपणास सहकार्य करण्यास तयार आहे. अशाप्रकारे या कार्यक्रमात आपले मनोगत बांगरे यांनी व्यक्त केले. तसेच केंद्रप्रमुख यांनी आपल्या मनोगतातून शाळेय विद्यार्थ्यांचे व शाळेचे गुणगौरव गायले. ङ्ग या कार्यक्रमासाठी प्रमुख मान्यवर सिद्धेश्वर ग्रामपंचायत सरपंच आशिका कैलास पवार, गटशिक्षणाधिकारी सुधागड साधूराम बांगारे, उपसरपंच शरद किंजवडे, ग्रामपंचायत सदस्या समृद्धी संतोष यादव, केंद्रप्रमुख सिद्धेश्वर कैलास म्हात्रे, ग्रामसेवक प्रवीण पाटील, सामाजिक कार्यकर्ते परमानंद राईलकर, माजी उपसरपंच, मा तंटामुक्ती अध्यक्ष संजय शिंदे, मा. उपसरपंच योगेश सुरावकर, पोलीस पाटील सुनील पोंगडे, ग्रामपंचायत सदस्य यादव मॅडम, ग्राम सेवासंघ सुरेखा यादव, आशा वर्कर मनीषा पोंगडे, शाळेय व्यवस्थापक कमिटी आजी–माजी विद्यार्थी, गावातील ज्येष्ठ नागरिक, महिला यांच्या उपस्थितीत रा . जि.प. शाळा सिद्धेश्वर १४९ वा वर्धापन दिन सोहळा उत्साहात पार पडला.

# रायगड जिल्ह्यातील नागाव समुद्र किनाऱ्यावर रंगणार नारळ फोडीची अनोखी स्पर्धा

नारळ फोडणाऱ्या स्पर्धकांना मिळणार आकर्षक बक्षीसे

मुंबई, रायगड सह तळ कोकणातील स्पर्धकांचा असेल सहभाग

डॉ.सचिन राऊळ व राकेश राणे मित्रमंडळाची जय्यत तयारी

पाली /बेणसे दि. (धम्मशील सावंत )– खेळांमध्ये अनेक वैशिष्ट्यपूर्ण खेळ आपण या अगोदर पाहिलेत, मात्र खेळी नारळ फोडणीचा खेळ कधी आपण पाहिलात का? तर कोकणात अशीच अनोखी खेळी नारळ फोडीची स्पर्धा आता रंगणार आहे.



नागावच्या मनमोहक नयनरम्य समुद्र किनारी भरणाऱ्या या नारळ फोडीच्या स्पर्धेत कोण बाजी मारणार याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे. या स्पर्धेत रायगड मुंबई सह तळ कोकणातील अनेक स्पर्धक सहभाग घेणार आहेत. डॉ.सचिन शरद राऊळ व राकेश अनंत राणे मित्रमंडळाने या स्पर्धेची जय्यत तयारी सुरू केलीय. ङ्गत्यामुळे या स्पर्धेमध्ये कोण बाजी मारणार हे पाहणं तितकंच महत्त्वाचं ठरेल. या स्पर्धेत अधिकाधिक स्पर्धक व प्रेक्षकांनी सहभाग दर्शवून कार्यक्रमाची शोभा वाढवावी असे आवाहन डॉ.सचिन राऊळ यांनी केलेय. खेळी नारळ स्पर्धेत सहभागी होण्यासाठी संपर्क विपुल राऊळ ७७९८६४२२१४ तसेच शैलेश नाईक ९८५०२३१५९५ यांच्याशी संपर्क साधावा असे सांगण्यात आले.

# मविआ नेत्यांची बैठक संपली; विधानसभेसाठी रणनीती ठरली, १६ ऑगस्टला प्रचाराचा शुभारंभ

मुंबई – पुढील काही महिन्यात राज्यात विधानसभा निवडणूक होणार आहे. या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीच्या प्रमुख नेत्यांची बैठक आज मुंबईत पार पडली. या बैठकीत विधानसभा निवडणुकीबाबत रणनीती ठरवण्यात आली आहे.येत्या १६ ऑगस्टला मुंबईतल्या षण्मुखानंद हॉलमध्ये मविआच्या कार्यकर्त्यांचा मेळावा घेऊन प्रचाराचा शुभारंभ करणार असल्याची माहिती काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी दिली आहे.या बैठकीनंतर मविआ नेत्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. त्यात विजय वडेट्टीवार म्हणाले की, आज मविआच्या तिन्ही पक्षातील प्रमुख नेत्यांची समन्वय बैठक पार पडली. या बैठकीत धोरणात्मक चर्चेवर अधिक भर होता. तिन्ही पक्षांनी मिळून राज्यात उत्तम सरकार दिले हे जनतेला ठाऊक आहे. संकटाच्या काळात मविआ सरकारने जे काम केले त्याची नोंद देशाने घेतली हेदेखील सर्वांना माहिती आहे. मविआच्या तिन्ही पक्षातील नेत्यांनी धोरणात्मक चर्चा केली. किमान समान कार्यक्रमावर चर्चा झाली. महाविकास आघाडीच्या जाहिरनाम्यावर चर्चा झाली. माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्या नेतृत्वात जाहिरनाम्याचं काम जोरात सुरू आहे. १६ ऑगस्टला षण्मुखानंद हॉलमध्ये महाविकास आघाडीच्या तिन्ही पक्षातील कार्यकर्त्यांचा तिन्ही पक्षाचे प्रमुख नेते, पदाधिकारी उपस्थित राहतील. एक उत्तम सरकार देण्याच्या दृष्टीने त्याचा शुभारंभ महाराष्ट्रात या



राज्यस्तरीय मेळावा होईल. त्याचसोबत २० ऑगस्टला माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या जयंतीनिमित्त राहुल गांधी मुंबईत येणार आहेत. त्यांच्या उपस्थितीत राज्यव्यापी बैठकीचं आणि मोठ्या रॅलीचं आयोजन आम्ही केले आहे. या कार्यक्रमात मविआच्या मान्यवर नेत्यांनी उपस्थित राहावं अशी विनंती आम्ही केली आहे असं त्यांनी सांगितले.त्याशिवाय १६ तारखेच्या मेळाव्याला महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यातील मेळाव्यातून होणार आहे. आज झालेली चर्चा मविआ सरकार आणण्याचं ध्येय ठेवून सकारात्मक चर्चा घडली. तिन्ही पक्ष मिळून या महाभ्रष्टाचारी सरकारला सत्तेतून हाकलवून द्यायचे. कुठे नेऊन ठेवलाय महाराष्ट्राला, गहाण ठेवलाय गुजरातला, मिंदे कंपनी राज्याला गुजरातकडे गहाण ठेवण्याचं काम करतेय. ४० टक्क्यांपर्यंत सरकारची कमिशनखोरी झालीय. निवडणुकीची वाट जनता बघतेय. या सरकारला सत्तेतून खाली खेचण्यासाठी वाट पाहतेय. त्यासाठीच आज धोरणात्मक, जाहिरनामा, किमान समान कार्यक्रम यावर चर्चा झाली. पुढची बैठक लवकरच होईल अशी माहिती विजय वडेट्टीवार यांनी दिली.दरम्यान, लोकसभेत मविआने महायुतीची चांगली जिरवली, आता विधानसभेला महायुतीला सत्तेतून हाकलवण्यासाठी आजची बैठक होती. निवडणुकीपूर्वी लोकप्रिय घोषणा आणून मतांची बिदागी करता येईल का असा महायुतीचा केविळवाणा प्रयत्न सुरू आहे. मध्य प्रदेशात अशी योजना आणली आणि २ महिन्यात ती गुंडाळली गेली. इतर विभागाचे पैसे कमी करून या योजनेवर सरकार पैसे खर्च करतंय. आम्ही महिलांना सन्मानाने उभं करण्याचं काम मविआ करेल. यापेक्षा अधिकची मदत, महागाईत गरीब कुटुंबाला जगणं मुश्किल झालंय. त्यामुळे आम्ही महिलांना आधार देण्याचं काम करणार आहोत असं त्यांनी सांगितले.

‘‘फसव्या योजनेला जनता बळी पडणार नाही‘‘

विद्युत बिल वाढवून सर्वसामान्यांकडून वसुली केली जातेय. महागाई वाढवून जेरीस आणायचं आणि निवडणुकीच्या तोंडावर अशा योजना आणून फसवणूक करायची. याला जनता बळी पडणार नाही. १५ हजारापेक्षा अधिक मुली महाराष्ट्रात बेपत्ता आहेत. महिलांवरील अत्याचारात महाराष्ट्र देशात दुसऱ्या नंबरवर आलेले आहे. त्यामुळे महिलांसाठी सुरक्षेची हमी हे लाभदायक आहे. सरकार जे काही निर्णय घेते त्याला जनता योग्य उत्तर देईल. महाभ्रष्टाचारी, ४० टक्के कमिशन घेणाऱ्या सरकारला सत्तेतून घालवायचा निर्णय जनतेनं आधीच घेतला आहे असा घणाघात विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी सरकारवर केला.

# श्रीवर्धन शासकीय कर्मचाऱ्यांकडून शासनाला लक्षवेधी निवेदन देण्यात आले

श्रीवर्धन कोलमांडाले सोपान निंबरे; दि ९ ऑगस्ट २०२४ रोजी शासकीय निमशासकीय कर्मचाऱ्यांकडून जुनी पेन्शन व विविध मागण्यांसाठी शासनाचे लक्ष वेधण्याकरिता लक्षवेधी निवेदन तहसीलदार महेंद्र वाकलेकर यांना देण्यात आले.

या वेळी राज्य कर्मचारी मध्यवर्ती संघटना ता अध्यक्ष रविदास जाधव, सरचिटणीस पंकज पाटील, एस बी पाटील, नितीन घुगे, विकास बोंडले, मडवी, चव्हाण, दिवेकर यांच्या सह जि.प. कर्मचारी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच नगर पालिका, ग्राम पंचायत कर्मचारी व कंत्राटी कर्मचारी समन्वय समिती पदाधिकारी उपस्थित होते.

राजस्थरिय शासकीय कर्मचारी तसेच कर्मचारी भरती ऐवजी कंत्राटी कर्मचारी नियुक्त करुन त्यांच्या कडून




जुनी पेन्शन योजना तसेच सर्वच सरकारी विभागातील रिक्त पदांची संख्या मोठ्या प्रमाणात असतांना देखील कर्मचारी पद भरती होत नाही. अत्यंत तुटपुंजा मानधनावर काम करुन घेतले जाते हे धोरण रद्द करुन त्यांच्या सेवा नियमीत करण्यात याव्यात. खासगीकरण धोरण रद्द करावे, बेरोजगारी कमी करण्यासाठी सरकारच्या सर्व विभागातील रिक्त पदे भरावी,

अनुकंपा तत्वावरील भरती विनाअट करावी, शिक्षण क्षेत्रातील विना अनुदान धोरण बंद करावे, शिक्षकांचे व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे प्रशासकीय स्वरुपाचे प्रलंबित प्रश्न तात्काळ सोडवावे,

ग्रामपंचायत कर्मचारी यांचे प्रलंबित प्रश्न प्राधान्याने सोडवावेत या व इतर अनेक मागण्यांबाबत सुध्दा सकारात्मक निर्णय घेऊन महाराष्ट्रातील शासकीय निमशासकीय कर्मचारी यांना न्याय द्यावे या करिता संघटनेच्या वतीने लक्षवेधी निवेदन देण्यात आले.

# सेट परीक्षेत श्री.रामचंद्र गंगाराम नांदिवडेकर यांचे यश

सावर्डे:- सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या वतीने २०२४ साठी घेण्यात आलेल्या सेट परीक्षेत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आगवे नं.१ चे पदवीधर शिक्षक श्री.रामचंद्र गंगाराम नांदिवडेकर यांनी पहिल्याच प्रयत्नात उत्तुंग यश संपादन केले आहे,या यशाबद्दल सर्वस्तरातून श्री.रामचंद्र नांदिवडेकर यांचे अभिनंदन होत आहे.



अभ्यासू व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांची ख्याती असून शिक्षणाचा अखंड प्रवाह चालू ठेवला आहे. ते स्वतः एच.एस.सी.(सायन्स), डी.एड; बी.ए.मराठी, बी.ए.इतिहास, एम.ए.मराठी, बी.एड; एम.ए.एज्यूकेशन, डी.ओ.ए.(कॉम्प्युटर), एम एस सी आय टी.;डी.एस.एम.व सेट परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत. यापुढे शिक्षणक्षेत्रातील पी एच डी मिळविण्याचा मनोदय असल्याचे सांगितले.ते विविध स्पर्धा परीक्षांचे मार्गदर्शन करीत असतात.

भविष्यात सावर्डेमध्ये स्पर्धा परीक्षांचे केंद्र बनविण्याचा मानस असल्याचे श्री.नांदीवडेकर सर यांनी सांगितले.

त्यांच्या या शिक्षण क्षेत्रातील उत्तुंग भरारी बद्दल शिक्षक परिवार,पालकवर्ग व विद्यार्थी वर्गातून त्यांचे विशेष कौतुक होत आहे.

# न्यू इंग्लिश स्कूल व ज्युनिअर कॉलेज,म्हसळा शाळेत शिक्षणमहर्षी डॉ.बापूजी साळुंखे यांचा ३७ स्मृतिदिन साजरा

द. रा. जि. प्रतिनिधी:
संतोष उध्दरकर.

म्हसळा: दि. ८ ऑगस्ट आज विद्यालयात शिक्षणमहर्षी प.पू डॉ. बापूजी साळुंखे यांचा ३७ वा स्मृतिदिन साजरा करण्यात आला त्याप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी स्कूल कमिटी चेअरमन समीर बनकर यांनी आपल्या मनोगत बापूजींच्या आठवणींना उजाळा देऊन त्यांनी अनेक कार्याविषयी प्रसंग विद्यार्थ्यांसमोर मांडले आणि आजच्या युवा पिढीला ज्ञान,विज्ञानाबरोबरच सुसंस्काराची गरज आहे हाच वारसा डोळ्यासमोर ठेवून समाजकार्य घडावे हीच खरी



बापूजींना आदरांजली होईल असे सांगितले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यालयाचे प्रभारी प्राचार्य शेख एम.ए यांनी मांडले आणि शिक्षक मनोगतात प्रा.चव्हाण सर यांनी बापूजींच्या कार्याविषयी मौलिक विचार मांडले व मुंडे सर यांनी बापूजीच्या जीवनावर आधारित कविता सादर केली आणि विद्यार्थी मनोगतात निर्मयी करडे,मृण्मयी सुतार,सलोनी जयस्वाल,अथर्व गायकवाड,कृष्णा अडसूळ,श्रीपाद लाड, पायल चव्हाण,भूमी देवी,कृपा म्हात्रे,अरुणा पवार,भाग्यश्री खोत,चांदणी दुरे आदी विद्यार्थ्यांनी बापूजींच्या जीवनाविषयी विचार व्यक्त केले आणि त्याचबरोबर बापूजींच्या वेशात आर्यन कळस,संस्थामाता सुशिलादेवी यांच्या वेशमध्ये अनुपा शिगवण व स्वामी विवेकानंद यांच्या वेशमध्ये रणवीर लहारे आले होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन क्रीडा शिक्षक मोरे एच.बी व आभार सौ शिर्के एस.ए यांनी मानले या कार्यक्रम प्रसंगी पर्यवेक्षक गायकवाड एन.एस ज्येष्ठ शिक्षक पाटील ई.सी, प्राध्यापिका सौ.देवगावकर मॅडम,लेखनिक भायदे सर,आदी शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

# देव्हारे विद्यालयात क्रांतीदिन मोठ्या उत्साहात संपन्न

आज दिनांक ९/८/२०२४ रोजी देव्हारे पंचक्रोशी हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय देव्हारे या ठिकाणी क्रांती दिन संपन्न झाला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान विद्यालयाचे प्राचार्य श्री. रामचंद्र कापसे सर यांनी भुषविले तसेच अस्ति पुजन, व क्रांतिदिनाची शपथ घेऊन कार्यक्रमाची सुरवात झाली. या कार्यक्रमास सर्व विदयार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.



तसेच अध्यक्षीय भाषण करताना श्री. कापसे सरांनी क्रांतिकारकांनी केलेल्या बलिदानाची माहिती सांगितली. व क्रांतिकारकांना भावपुर्ण आदरांजली अर्पण केली. विद्यालयाचे शिक्षक श्री. यादव सरांनी सगळ्यांचे आभार मानले. व कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# ग. बा. वडेर हायस्कुलमध्ये आदिवासी दिन व क्रांती दिन उत्साहात संपन्न आदिवासी क्रांतिकारकांची माहिती चित्र प्रदर्शन

रायगड जिल्हा
उत्तर प्रतिनिधी/मंगेश यादव

पालीतील सुएसोचे ग. बा. वडेर व व. ग. ओसवाल कनिष्ठ महाविद्यालय येथे शुक्रवारी (ता. ९) जागतिक आदिवासी



दिन व क्रांती दिन संपन्न झाला. यावेळी आदिवासी क्रांतिकारकांची माहिती चित्र प्रदर्शन प्रा. डी. बी. शिद यांच्या संकल्पनेत मांडण्यात आले होते. विद्यार्थ्यांना यातून बहुमूल्य माहिती मिळाली

आपल्या अलौकिक परंपरेतून जागतिक पटलावर वैशिष्टयपूर्ण संस्कृती असणाऱ्या आदिवासी बांधवांच्या जागतिक आदिवासी दिन तसेच देशाच्या स्वातंत्र्यासाठी आपले सर्वस्व अर्पण करणाऱ्या क्रांतीविरांचा क्रांतीदिनाची माहिती व महत्व यावेळी सांगण्यात आले. विद्यार्थ्यांनी गाणे, भाषणे मधून आदिवासी संस्कृतीचे दर्शन घडवले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. संदीप कनघरे तर प्रमुख पाहुणे महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. भागवत खेडकर हे होते. कार्यक्रमास प्रा. हरिदास घोळवे, प्रा. राकेश बेलोसे, प्रा. आदिनाथ पोटे, प्रा. बकुळा म्हात्रे व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक दुर्गादास शिद यांनी केले तर सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रा. किसन वारघडे यांनी केले यावेळी सर्व शिक्षकांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले.

# मुंबईतील वाहतूक कोंडी दिवसेंदिवस भयानक

विनेश फोगट या जिगरबाज, लढाऊ आणि कमालीच्या प्रतिकूलतेतही स्पर्धात्मकता कायम ठेवू शकणाऱ्या जिद्दी खेळाडूविषयी अतीव करुणा, सहानुभूती, सहवेदना व्यक्त केल्यानंतर ही काही उदाहरणे : २०१७ च्या आशियाई स्पर्धांत भारतीय धावपटू संघ बाद केला गेला, कारण धावताना त्यांच्याकडून 'अनवधानाने' मार्गिका (लेन) बदलली गेली. त्यानंतर दोन वर्षांनी २०१९ साली आंतरराष्ट्रीय स्क्वॉश स्पर्धांत भारतीय संघ आपल्या महामंडळाच्या दफ्तर दिरंगाईने पोहोचूच शकला नाही. त्याआधी एक वर्ष २०१८ च्या जाकार्ता आशिया स्पर्धेच्या उद्घाटनात भारतीय ध्वजवाहकांची भलतीच फजिती झाली. गेल्या टोकियो ऑलिम्पिक्समधून आपली कमलप्रीत कौर अशीच बाद ठरली. गेल्या सहस्राकात १९९८ सालच्या आंतरराष्ट्रीय स्पर्धांत पी. टी. उषा खिळ्यांचे बूट घालून धावल्या होत्या आणि २०१६ साली द्युती चांदकडूनही असाच प्रमाद घडला. नव्या सहस्राकाच्या पहिल्याच वर्षी २००० सालच्या स्पर्धांत सीमा पुनिया थाळीफेक स्पर्धेतून बाद केली गेली. आपला कोणी खेळाडू स्पर्धाकाळात खोकल्याचे औषध घेतल्याने बाद ठरतो तर कधी अन्य काही सेवन करू नये ते सेवन केल्याने स्पर्धेबाहेर काढला जातो. वरील उदाहरणे अगदी वानगीदाखल. क्रीडाप्रेमी, अभ्यासक अशी आणखी काही उदाहरणे देऊ शकतील. या सगळ्यांतून आपले काही दुर्गुण पुन:पुन्हा समोर येतात.

व्यवस्था/ नियमन यांस गांभीर्याने न घेण्याची वृत्ती, सर्वत्र 'चलता है' मानसिकता, शास्त्रकाट्याच्या कसोट्यांपेक्षा उत्स्फूर्ततेवर वेळ मारून नेण्याची वृत्ती आणि या सगळ्यांच्या जोडीला याच दुर्गुणांनी युक्त भारतीय क्रीडा व्यवस्थापनाची बेफिकिरी. देशात काहींना काही वा त्यातील आणखी काहींना 'सर्व काही' मॅनेज करता येत असेल. येतेही. वाटेल ते गैरव्यवहार, नियमांकडे सर्रास काणाडोळा केला तरी त्यांचे काही बिघडत नाही आणि ते बिघडत नाही म्हणून सामान्यांनाही त्याबाबत काही वाटत नाही. "कायद्यासमोर सर्व समान असले तरी काही अधिक समान असतात", हे ऑर्वेली सत्य आपल्या जगण्याचे तत्त्वज्ञान! त्यामुळे नियम काटेकोरपणे पाळायचे असतात आणि आपण तसे नसलो तरी जगाच्या पाठीवर असे नियम पाळणारे असतात याचेच आपणास विस्मरण होते. हे वास्तव एकदा लक्षात घेतले की विनेश फोगट हिच्यासंदर्भात काय झाले, त्याचा विचार-विश्लेषण करणे सोपे ठरेल. विनेश ज्या वजनी गटात खेळत होती त्या गटात स्पर्धेआधी आणि नंतर वजनात किमान आणि कमाल किती फेरफार खपवून घेतला जातो, याचे नियम ऑलिम्पिक स्पर्धेआधीच निश्चित केले गेलेले असतात आणि इतक्या उच्च दर्जाच्या स्पर्धांत हे नियम कसोशीने पाळण्यासाठी काय काय खबरदारी घ्यायला हवी हेही विनेश आणि त्यापेक्षा तिच्या व्यवस्थापकांस ठाऊक असते. निदान तसे अपेक्षित असते. इतक्या उंचीवर स्पर्धक गेल्यावर त्याच्यासमवेत मानसोपचारतज्ज्ञासह आहार-विहारतज्ज्ञही असतोच असतो. स्पर्धा काळात काय खावे, काय खाऊ नये याचे नियमही या सर्वांस माहीत असतात. अशा स्पर्धांत एक फेरी संपल्यानंतर आणि पुढच्या फेरीच्या आधी वजन, अमली पदार्थ सेवन आदी चाचण्या होतात याचीही माहिती या सर्वांना अर्थातच असणार. असे असतानाही अंतिम फेरीच्या आधी तब्बल दोन किलोंनी विनेशचे वजन वाढू देण्याइतकी बावळट चूक या सर्वांकडून होतेच कशी? या दोन किलोंनी वाढलेल्या वजनांतील एक किलो आणि सुमारे ९०० ग्राम तिने रात्रभर घाम गाळून कमी केले. तरीही तिचे वजन कमाल वजनापेक्षा १०० ग्रामने जास्त भरले. साहजिकच अंतिम फेरीसाठी ती अपात्र ठरली. या अत्यंत दुर्दैवी घटनेवर देशभर गदारोळ उडणे साहजिक. त्यावर प्रतिक्रिया व्यक्त करताना मुष्टियोद्धा विजेंदर सिंग म्हणाला : अवघ्या १०० ग्राम वजनवाढीसाठी विनेशला अपात्र ठरवणे अयोग्य आहे.

हीच खरी आपली शोकांतिका. कमाल मर्यादा जर ५० किलोची आहे, त्यात आणखी एक किलोची सवलत मिळत असेल तर स्पर्धकाचे वजन ५१ किलोच्या आत हवेच हवे, हे अध्याहृत आहे. असे असताना ते विहित मर्यादेपेक्षा 'फक्त शंभर ग्राम' जास्त असल्यास 'गोड मानून' घ्यायला हवे, असे वाटतेच कसे? शास्त्रकाट्याच्या अचूक, नेमक्या कसोटीस सामोरे जाण्याची आपली मानसिकता का नाही? सगळ्यात आपले अनमानधपका धोरण आणि 'होऊन जाईल' ही वृत्ती! या सर्व नियम काट्यांकडे खेळाडूंनी लक्ष ठेवायचे की खेळावर लक्ष केंद्रित करायचे, असा प्रश्न यावर काहींचा असेल. त्याचे उत्तर असे की स्पर्धकांस खेळाकडे लक्ष देता यावे म्हणून तर व्यवस्थापकादी मंडळीचा इतका फौजफाटा त्यांच्या दिमतीला असतो. ते या प्रकरणात काय करत होते? हे सर्व सरकारी अधिकारी. एखादी फाइल इकडून तिकडे हलवणे आणि एखाद्या खेळाडूस उपांत्य फेरीतून अंतिम फेरीसाठी नेणे यातील किमान फरक या सर्वांस कळणे अपेक्षित. पण त्यांच्या कृतीवरून तसे म्हणता येत नाही. "लष्करातील जवानांना ऑलिम्पिकला पाठवा पाच-दहा पदके ते 'यूँ करके' आणतील", असे विधान आपल्याकडे सर्वोच्च सत्ताधीशच जर करत असतील तर ऑलिम्पिक स्पर्धा, त्यात सर्व गुणांचा लागणारा कस, एका सेकंदाच्या हजारपाचशेव्या सूक्ष्मातिसूक्ष्म कालमापनाची क्षमता आणि त्या कसोटीवर उतरण्यास तयार असलेले देशोदेशींचे स्पर्धक आदींचे गांभीर्य समाजास कसे असणार? अशा दर्जाच्या स्पर्धांमध्ये खिळे लावलेल्या बुटांनी स्पर्धेत धावायचे नसते, सर्दी-खोकल्याची औषधेही या काळात घ्यायची नसतात, धावताना मार्गिका बदलायची नसते इतक्या साध्या पण अत्यंत महत्त्वाच्या नियमांची आणि त्यांचे पालन करण्याच्या गांभीर्याची जाणीव याच समाजातील खेळाडूंना कोण आणि कशी करून देणार?

दुसरे असे की हे सर्व यम-नियम डोळ्यात तेल घालून एरवीही पाळले जायलाच हवेत.

# तळा येथे आदिवासी दिन जल्लोषात साजरा.२४ आदींवासी वाडया एकत्र येत साजरा केला आदिवासी दिन

(तळा कृष्णा भोसले.

तालुक्यात शुक्रवारी जागतिक आदिवासी दिन जल्लोषात साजरा करण्यात आला.तळा तालुक्यात असलेल्या २४ आदिवासी वाड्यातील नागरिकांनी पहिल्यांदाच एकत्र येत मोठ्या उत्साहात



आदिवासी दिन साजरा केला.आदिवासी समाजाच्या समस्या, त्यांचे अधिकार,हक्क,अस्तित्व,चालीरिती यांचे रक्षण व्हावे म्हणून सन १९९४ साली संयुक्त राष्ट्र संघाने जागतिक आदिवासी वर्ष घोषित केले.व ९ ऑगस्ट हा जागतिक आदिवासी दिन म्हणून साजरा करण्यात येऊ लागला.त्या अनुषंगाने तळा तालुक्यात असलेल्या २४ आदिवासी वाड्यातील नागरिकांकडून आदिवासी दिनाचे आयोजन करण्यात आले होते.यानिमित्ताने चंडिका मंदिर ते नगरपंचायत कार्यालय अशी भव्य मिरवणूक काढण्यात आली होती.या मिरवणुकीत २४ वाड्यातील आदिवासी बांधव व महिला मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या.यांसह आदिवासी सभागृह येथे समाजासाठी काम करणाऱ्या व्यक्तींचा व दहावी बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.तसेच विद्यार्थ्यांच्या सांस्कृतिक कार्यक्रमाचे देखील आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी तालुक्यातील आदिवासी समाजाचे पदाधिकारी,ग्रामस्थ व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

दैनिक
# सूर्योदय
शनिवार १० ऑगस्ट २०२४



या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

## तालुका स्तरीय बुद्धिबळ स्पर्धेत देव्हारे विद्यालयाचे सुयश

दिनांक ०७/०८/२०२४ रोजी पालवणी येथे पार पडलेल्या बुद्धिबळ स्पर्धेत देव्हारे पंचक्रोशी हायस्कूल व



कनिष्ठ महाविद्यालय देव्हारे, चे १४,१७,१९ वयोगट मुले समाविष्ट झाली होती.

त्यामधील १९ वर्ष वयोगटातील कु. ओम बबन म्हाब्दी याने प्रथम क्रमांक पटकविला व कु.निखिल सुनील शिगवण याने तृतीय क्रमांक पटकविला, या विजयी खेळाडूंचे विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. कापसे सर,

सर्व शिक्षक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी, स्थानिक कमिटी सदस्यांनी, विजयी खेळाडूंचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

विद्यालयाचे क्रीडा शिक्षक श्री. अमित रसाळ यांनी खेळाडूंना मार्गदर्शन केले. त्यामुळे विजयी खेळाडूंचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

## कर्मवीर इदाते महाविद्यालयाने तालुकास्तरीय बुध्दीबळ स्पर्धेमध्ये मारली बाजी

मंडणगड-(प्रतिनिधी) दि. : सावित्रीबाई फुले षिक्षण प्रसारक मंडळाच्या कर्मवीर भि. रा. तथा दादा इदाते वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयातील विद्याथ्र्यांनी तालुकास्तरीय बुध्दीबळ



स्पर्धेमध्ये घवघवीत यश संपादन केले. यामध्ये इयत्ता ११ वी विज्ञान वर्गातील कु. प्रेरणा म्हामुणकर हिने तालुकास्तरीय बुध्दीबळ स्पर्धेत मुलींच्या गटामध्ये प्रथम क्रमांक व इयत्ता ११ वी वाणिज्य वर्गातील कु. तनिशा खेरटकर हिने व्दितीय क्रमांक संपादन केला तर मुलांच्या गटामधून तालुकास्तरीय बुध्दीबळ स्पर्धेत इयत्ता १२ वी विज्ञान वर्गातील रोहन नलावडे याने व्दितीय क्रमांक संपादन केला. सर्व यशस्वी विद्याथ्र्यांचे मंडणगड परिसरातून अभिनंदन होत आहे. ङवरील सर्व विद्याथ्र्यांनी तालुकास्तरावर सुयश प्राप्त केले असून त्यांची जिल्हास्तरावर निवड झाली आहे. प्राचार्य डॉ. राहूल जाधव यांच्या योग्य मार्गदर्शनाखाली क्रीडाशिक्षक प्रा. अशोक कंठाळे, प्रा. साई पवार, प्रा. रोहित सुखदरे यांनी विद्यार्थी यशस्वी होण्यासाठी परिश्रम घेतले. ङयशस्वी विध्यार्थ्यांचे संस्थापक अध्यक्ष पद्मश्री कर्मवीर दादा इदाते, संस्थाध्यक्षा सौ. संपदाताई पारकर, कार्याध्यक्ष श्री.श्रीराम इदाते, कार्यवाह प्रा. सतीश शेठ, सर्व संस्थापदाधिकारी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राहुल जाधव, उपप्राचार्य डॉ. वाल्मिक परहर, क्रीडा विभागप्रमुख प्रा. अशोक कंठाळे, प्रा. साई पवार, प्रा. रोहित सुखदरे सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांनी त्यांचे अभिनंदन केले व पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

## पणदेरी पेवे पंचक्रोशी हायस्कूल चे तालुका स्तरीय बुद्धिबळ स्पर्धेत यश

मंडणगड प्रतिनिधी

मंडणगड तालुका तालुका विकास मंडळ मुंबई संचलित, पणदेरी पेवे पंचक्रोशी हायस्कूल च्या विद्यार्थ्यांनी तालुका स्तरीय बुद्धिबळ स्पर्धेत पहिल्यांदाच आपले विद्यार्थी उतरवून



प्रस्थापितांना धक्का देत विजयाला गवसणी घातली आहे. यामध्ये १४ वर्षे वयोगट मुलींच्या स्पर्धेत इ.८ वी मधील विद्यार्थिनी कुमारी आर्या सतीश सवणसकर हिने ५ वा क्रमांक पटकावला तर त्याच गटात इ.८ वी मधील कुमारी पायल दत्तात्रय घुगे या विद्यार्थिनीने प्रथम क्रमांक पटकावून सर्वांनाच आश्चर्याचा धक्का दिला. सदर दोन्हीही विद्यार्थिनी जिल्हा स्तरासाठी पात्र झाल्या आहेत.दोन्हीही विद्यार्थिनींना प्रशालेचे क्रीडा विभाग सांभाळणारे श्री.इंगळे आर. व्ही.यांचे मार्गदर्शन लाभले प्रशालेच्या या यशाबद्दल संस्था, प्रशालेचे प्र.मुख्याध्यापक , शालेय समिती अध्यक्ष व सदस्य , शाळा व्यवस्थापन समिती, पालक, सर्व शिक्षक , शिक्षकेतर कर्मचारी , माजी विद्यार्थी यांच्याकडून कौतुकाचा वर्षाव होत आहे.

## मनसेच्या वतीने जिल्हा शल्य चिकित्सक अधिकारी यांना उपजिल्हा अध्यक्ष विनोद जानवळकर यांचे निवेदन..

प्रयोगशाळा सहाय्यक रणजित किल्लेकर यांची गुहागर येथे पुन्हा बदली करावी अशी आग्रही मागणी..!

आबलोली (संदेश कदम)ङगुहागर तालुका महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने जिल्हा शल्य चिकित्सक अधिकारी यांना प्रयोगशाळा सहाय्यक रणजित किल्लेकर यांची गुहागर येथे पुन्हा बदली करावी अशी आग्रही मागणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे उपजिल्हा अध्यक्ष विनोद जानवळकर, तालुकाध्यक्ष सुनील हळदणकर यांनी जिल्हा शल्य चिकित्सक अधिकारी यांना दिलेल्या निवेदनात केली आहे या निवेदनात पुढे म्हटले आहे की,गुहागर ग्रामीण रुग्णालयातून दापोली उपजिल्हा रुग्णालयात प्रशासकीय बदली झालेले



प्रयोगशाळा सहाय्यक रणजित किल्लेकर यांची गुहागर ग्रामीण रुग्णालयात पुन्हा बदली करण्यात यावी अशी गुहागर तालुक्यातील नागरिकांची आग्रही मागणी आहे. तरी गुहागर ग्रामीण रुग्णालयांमध्ये उत्कृष्ट सेवा देणारे प्रयोगशाळा सहाय्यक रणजित किल्लेकर हे सध्या उपजिल्हा रुग्णालय दापोली येथे सेवा देत आहेत त्यांची गुहागर येथे पुन्हा बदली करण्यात यावी अशी आग्रही मागणी यापूर्वीही महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने रत्नागिरी जिल्हा रुग्णालयाचे शल्यचिकित्सक यांच्याकडे निवेदनाव्दारे करण्यात आली होती. मात्र याबाबत कोणतेही कार्यवाहीच करण्यात आली नाही तरी ङगुहागर ग्रामीण रुग्णालया मध्येङ प्रयोगशाळा सहाय्यक म्हणून पदावर असलेले रणजित किल्लेकर हे गेली १० वर्ष अविरतपणे काम करत होते. कोरोना काळातही त्यांनी दिवस - रात्र उल्लेखनीय कामगिरी करुन रुग्नांना चांगली आरोग्य सेवा दिली आहे ते प्रत्येकाशी आपुलकीने आणि आदराने बोलत असत सध्या त्यांची प्रशासकीय बदली उपजिल्हा रुग्णालय दापोली येथे करण्यात आली आहे तरी प्रयोगशाळा सहाय्यक रणजित किल्लेकर यांची गुहागर ग्रामिण रुग्णालयात पुन्हा बदली करण्यात यावी अशी गुहागर तालुक्यातील जनतेची व मनसेची आग्रही मागणी आहे असे निवेदन मनसेचे उपजिल्हा अध्यक्ष विनोद जानवळकर , तालुकाध्यक्ष सुनिल हळदणकर यांनी जिल्हा शल्यचिकित्सक अधिकारी यांचेकडे निवेदनाद्वारे केली आहे


## आपचे नेते मनिष सिसोदिया यांना सर्वोच्च दिलासा; सर्वोच्च न्यायालयाकडून जामीन मंजूर, १८ महिन्यांनंतर होणार सुटका

अलिबाग प्रतिनिधी

राजेश बाष्टे:

आम आदमी पक्षाचे नेते, दिल्लीचे माजी उपमुख्यमंत्री मनिष सिसोदिया यांना सर्वोच्च न्यायालयाने मोठा दिलासा दिला आहे. दिल्ली मद्यघोटाळा प्रकरणात सीबीआय आणि ईडीने केलेल्या कारवाईमध्ये मनिष सिसोदिया यांना सुप्रीम कोर्टाने जामीन मंजूर केला असून तब्बल १८ महिन्यानंतर ते जेलमधून बाहेर येणार आहेत.

मनिष सिसोदिया यांना गेल्यावर्षी फेब्रुवारी




महिन्यात अटक करण्यात आली होती, तेव्हापासून ते तुरुंगात आहेत. अखेर १८ महिन्यांनी सर्वोच्च न्यायालयाने सिसोदिया यांना १० लाख रुपयांच्या जातमुचलक्यावर जामीन मंजूर केला आहे. ईडी आणि सीबीआय प्रकरणात सिसोदिया यांना प्रत्येकी १० लाख रुपयांचा बाँड भरावा लागणार असून ते आता तुरुंगातून बाहेर येणार आहेत. सर्वोच्च न्यायालयाने मनिष सिसोदिया यांना जामीन देताना काही अटी ठेवल्या आहेत. मनिष सिसोदिया यांना त्यांचा पासपोर्ट जमा करण्याचे निर्देश दिले आहेत. दर सोमवारी त्यांना पोलीस ठाण्यात साक्ष द्यावी लागणार आहे. यासोबतच साक्षीदारांवर प्रभाव टाकण्याचा प्रयत्न करू नका, असं देखील न्यायालयाने सांगितले आहे.ङङमनिष सिसोदिया यांना ट्रायल कोर्टात पाठवण्याची ईडीची मागणी सुप्रीम कोर्टाने फेटाळून लावली. जामीन हा नियम आहे आणि तुरुंग हा अपवाद आहे हे ट्रायल कोर्ट आणि हायकोर्टाने समजून घ्यायला हवे. खटला पूर्ण केल्याशिवाय कोणालाही तुरुंगात ठेवता येत नाही आणि शिक्षाही करता येत नाही,

असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे. दरम्यान, सुप्रीम कोर्टाने त्यांना पासपोर्ट सरेंडर करण्याची आणि साक्षीदारांवर प्रभाव न टाकण्याची अट घातली आहे. मनिष सिसोदिया यांना रद्द करण्यात आलेले दिल्ली मद्य उत्पादन धोरण २०२१-२ तयार करण्यात आणि त्याच्या अंमलबजावणीतील अनियमिततेच्या आरोपाखाली अटक करण्यात आली होती. यापूर्वी २६ फेब्रुवारी २०२३ रोजी केंद्रीय अन्वेषण विभागाने () अटक केली होती. नंतर, अंमलबजावणी संचालनालय म्हणजेच ईडीनेही सिसोदिया यांच्यावर वेगवेगळ्या आरोपाखाली कारवाई केली होती.ङङआम आदमी पार्टीच्या सर्व कार्यकर्त्यांनी सुप्रीम कोर्टाने दिलेल्या सदर निर्णयाचे स्वागत केले आहे. सुप्रीम कोर्टाचे म्हणणे आहे ‘‘जेल हा एक अपवाद असतो आणि जामीन हा हक्क‘‘ त्या अनुषंगाने आमचे वरिष्ठ नेते माननीय अरविंद केजरीवालजी यांनाही नक्कीच जामीन मिळेल अशी आम्हाला आशा आहे आणि आता पक्ष अजून जोमाने कार्य करेल असे पक्षाचे महाराष्ट्र राज्य संघटन मंत्री डॉ. रियाज पठाण यांनी सांगितले.

## मतदार नोंदणी, वगळणी, दुरुस्तीसाठी विशेष शिबीर १० व ११ ऑगस्ट, १७ व १८ ऑगस्ट रोजी आयोजन

पेण शहर प्रतिनिधी-नितेश म्हात्रे

निवडणूक आयोगाने १ जुलै २०२४ या अर्हता दिनांकावर आधारित मतदार याद्यांचा विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रम जाहीर केला आहे. त्यानुसार रायगड जिल्ह्यातील ७ विधानसभा मतदार संघाची प्रारूप मतदार यादी जिल्ह्यातील सर्व विधानसभा मतदारसंघांतर्गत सर्व मतदान केंद्रावर, सर्व मतदार नोंदणी अधिकारी कार्यालय,

उपविभागीय अधिकारी कार्यालय, तहसिल कार्यालय, पंचायत समिती कार्यालय इ. ठिकाणी ६ ऑगस्ट रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे. जिल्ह्यात सर्व मतदारसंघात युवा, महिला दिव्यांग व्यक्तीची मतदार नोंदणी, वगळणी व दुरुस्तीसाठी विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी किशन जावळे यांनी दिली.

प्रारूप मतदार यादी प्रसिद्धीनंतर राजकीय पक्षाची बैठक जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित करण्यात आली होती. यावेळी जिल्हाधिकारी श्री.जावळे यांच्या हस्ते सर्व राजकीय पक्षांना प्रारूप मतदार यादीचे वितरण करण्यात आले. या बैठकीस अप्पर जिल्हाधिकारी सुनील थोरवे, उप जिल्हा निवडणूक अधिकारी स्नेहा उबाळे आदी उपस्थित होत.ङ प्रारूप मतदारयादी मंगळवारी, ६ ऑगस्टला प्रसिद्ध करण्यात आली आहे. ६ ऑगस्ट ते २० ऑगस्ट या कालावधीत दावे व हरकती नोंदविण्यात येईल व दावे व हरकती या २९ ऑगस्टपर्यंत निकाली करण्यात येणार आहेत.तसेच अंतिम मतदार यादी ३० ऑगस्टला प्रसिद्ध होणार असल्याचे ही जावळे यांनी यावेळी सांगितले.

जिल्ह्यात सर्व मतदारसंघात युवा, महिला दिव्यांग व्यक्तीची मतदार नोंदणी, वगळणी व दुरुस्तीसाठी विशेष शिबिराचे १० व ११ ऑगस्ट तसेच १७ व १८ ऑगस्ट रोजी आयोजन करण्यात आले आहे. तरी सर्व राजकीय पक्ष यांनी मतदान केंद्रस्तरीय प्रतिनिधी यांची नेमणूक करावी. तसेच प्रत्येक बीएलओ मार्फत एका दिवशी १० अर्ज स्वीकारण्यात येतील व संपूर्ण पुनःरीक्षण कालावधीत जास्तीत जास्त ३० अर्ज स्वीकारण्यात येतील असेही जावळे यांनी यावेळी सांगितले. तरी प्रसिद्ध करण्यात आलेल्या प्रारुप मतदार यादीमध्ये मतदाराचे नाव, घराचा पत्ता, फोटो, दुरुस्ती, मयत, स्थलांतरित मतदारांची वगळणी इ. बाबत हरकती व सूचना असल्यास संबंधित मतदार नोंदणी अधिकारी यांच्याकडे २० ऑगस्टपूर्वी हरकती दावे दाखल करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, रायगड किशन जावळे यांनी केले आहे.निवडणूक अधिकारी स्नेहा उबाळे आदी उपस्थित होते.

पुणे विभागीय कार्यालय पत्ता : बालाजी नगर कळ्ळ्ळ बँक शेजारी कुडाळकर क्लास पहिला मजला पुणे जिल्हा कार्यालय दैनिक सूर्योदय – अक्षय संभाजी कामठे (संपादक पुणे आवृत्ती), संपर्क : ९६२३२३०४२६

हे पत्र मालक, प्रकाशक संपादक गंगाधर सिताराम काळकुटे यांनी माऊली ऑफसेट प्रिंटर, एम.एस.ई.बी. ऑफीसजवळ, माळीवेस बीड- ४३११२२ येथे छापून दैनिक महाराष्ट्र सूर्योदय, हॉटेल रायगड, जिल्हाधिकारी ऑफीससमोर, नगर रोड, बीड ४३११२२ येथे प्रकाशित केले. मुख्य कार्यालयः जिल्हाधिकारी कार्यालया समोर, नगर रोड, बीड मुख्य संपादकः गंगाधर काळकुटे मो. ९८५४८९८९८९ , अंकामधील छापून आलेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (वाद बीड न्यायकक्षेत )